महाराष्ट्र शासन

# इस्माईल युसूफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

**जोगेश्वरी (पूर्व) मुंबई नं 60.**

(स्थापना :- 1930)

दुरध्वनी क्र. :- 022 28352881 Email: principaliyc@yahoo.in दुरध्वनी क्र. व फॅक्स :- 022 28202188

---

जा.क्र/इ.यु.म./2021-22/2212 दिनांक : 24/11/2021

## सूचना

या महाविद्यालयातील मागासवर्गीय प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, मुंबई उपनगर, यांचे महाविद्यालयास प्राप्त पत्र क्र. सआसक/मुउप/२०२१-२२/३४२८ दि.२२/११/२०२१ नुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे, तरी मागासवर्गीय प्रवर्गातील विध्यार्थांनी वसतिगृह प्रवेशासाठी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, मुंबई उपनगर यांचे कार्यालय येथून वसतिगृह प्रवेशाकरिता विस्तारित माहिती प्राप्त करुन घ्यावी.

सोबत - सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, मुंबई उपनगर यांचे पत्र.

प्राचार्य

PRINCIPAL
Government of Maharashtra's
Ismail Yusuf College of
Arts, Science & Commerce.
Jogeshwari (East), Mumbai - 400 060

(१) डॉ. ... आवेत
२५/११/२०२१

(२) University for Students

सत्यमेव जयते

# सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर.

प्रशासकिय इमारत, ४ था मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर (पू.), मुंबई ७१.
दुरध्वनी- ०२२-२५२२२०२३
ईमेल आयडी - acswomumbaisub@gmail.com

जाक्र. सआसक/मुउप/२०२१-२२/ ९४२८ दिनांक- २२/११/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व महाविद्यालये
मुंबई उपनगर.

विषय :- महाविदयालयातील विदयार्थ्यांना वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्याबाबतची माहिती देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते कि, या कार्यालयाच्या अधिनस्त चार शासकीय वसतिगृह असून सदर वसतिगृहात विदयार्थ्यांच्या राहण्याची, भोजनाची मोफत सुविधा असून विदयार्थ्यांना मासिक निर्वाहभत्ता, स्टेशनरी रक्कम देण्यात येते.

सदर वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून सदर वसतिगृहाच्या प्रवेशाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी आपल्या महाविदयालयातील गरजू पात्र विदयार्थ्यांना या वसतिगृह योजनेचा लाभ घेता यावा म्हणून आपण आपल्या स्तरावरुन विदयार्थ्यांना वसतिगृह योजनेबाबत अवगत करावे.

वसतिगृहातील रिक्त जागा पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | वसतिगृहाचे नाव | वसतिगृह | मुलांचे/मुलींचे | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| १. | मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह,मुलुंड (गुणवंत विदयार्थ्यांचे वसतिगृह) | केवळ कनिष्ठ महाविदयालयीन विदयार्थ्यांकरिता व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांकरिता असलेले वसतिगृह | मुलींचे. | ४३ |
| २. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह,कांदिवली (गुणवंत विदयार्थ्यांचे वसतिगृह) | केवळ कनिष्ठ महाविदयालयीन विदयार्थ्यांकरिता व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांकरिता असलेले वसतिगृह | मुलांचे | ६८ |
| ३. | महात्मा ज्योतिबा फुले मुलांचे शासकीय वसतिगृह,जोगेश्वरी | कनिष्ठ व वरिष्ठ महाविदयालयीन विदयार्थी तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विदयार्थ्यांकरिता असलेले वसतिगृह | मुलांचे | ९० |
| ४. | संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतिगृह,चेंबूर | कनिष्ठ व वरिष्ठ महाविदयालयीन विदयार्थी तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विदयार्थ्यांकरिता असलेले वसतिगृह | मुलांचे | १०८ |

वसतिगृह प्रवेशाची पात्रता-

१. सदर विदयार्थी स्थानिक रहिवासी नसावा.
२. विदयार्थ्याचे उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त नसावे.
   i) अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विदयार्थ्यांकरिता उत्पन्न मर्यादा - रु.२ लाखापर्यंत.
   ii) इतर जाती प्रवर्गाच्या विदयार्थ्यांकरिता उत्पन्न मर्यादा - रु.१ लाखापर्यंत.
३. महाविदयालयात प्रवेश निश्चित झालेला असावा.
४. मागासवर्गीय विदयार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र असावे.
५. विदयार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
६. केवळ कनिष्ठ महाविदयालयीन विदयार्थ्यांकरिता व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांकरिता असलेल्या (गुणवंत विदयार्थ्यांचे वसतिगृह) वसतिगृहाच्या प्रवेशाकरिता ५५% पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे.
७. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास असलेल्या विदयार्थ्यांनाच वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो. केवळ पदवीका अभ्यासक्रमानंतर पदवीकेच्या व्दितीय वर्षास प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना वसतिगृहात व्दितीय वर्षास प्रवेश देण्यात येतो.

सहायक आयुक्त, समाज कल्याण,
मुंबई उपनगर.